**शपथेवर सरतपास श्रीमती.दाते वकील मॅडम अर्जदारातर्फे :—**

१३. आता मला माझे शपथपत्र **नि.क्र. यु—६** दाखविले. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर माझ्या सांगितल्याप्रमाणे खरा व बरोबर आहे. आता मला मी प्रकरणामध्ये दाखल फॉर्म अ—अ मधील मोटार वाहन अपघाता बाबतचा अहवाल दाखविला त्यास **नि.यु.१४** दाखविण्यात येते. आता मला मी प्रकरणामध्ये दाखल एफ.आय.आर. प्रत दाखविली त्यास नि.यु.१५ देण्यात येते. आता मला मी प्रकरणामध्ये दाखल घटनास्थळ पंचनामा दाखविला त्यास **नि.यु.१६** देण्यात येते. आता मला मी प्रकरणामध्ये दाखल इनक्वेस्ट पंचनामा दाखविला त्यास **नि.यु.१७** देण्यात येते. आता मला मी प्रकरणामध्ये दाखल शवविच्छेदन पंचनामा दाखविला त्यास **नि.यु.१८** देण्यात येते. आता मला मी प्रकरणामध्ये दाखल माझे आधार कार्डची मुळ प्रतीवरून पडताळणी केलेली प्रत दाखविली त्यास **नि.यु.१९** देण्यात येते. आता मला मी प्रकरणामध्ये दाखल माझे पती सुधाकर डोंगडे यांचे आधार कार्डची मुळ प्रतीवरून पडताळणी केलेली प्रत दाखविली त्यास **नि.यु.२०** देण्यात येते. आता मला मी प्रकरणामध्ये दाखल माझा मयत मुलगा अक्षय डोंगरे याचे आधार कार्डची छायांकित प्रत दाखविली त्यास आर्टिकल अ देण्यात येते. आता मला मी प्रकरणामध्ये दाखल माझे व माझे पती यांच्या पॅन कार्डची मुळ प्रतीवरून पडताळणी केलेली प्रती दाखविल्या त्यास अनु.**नि.यु.२१ व नि.यु.२२** देण्यात येते. आता मला मी प्रकरणामध्ये दाखल माझे पती यांचे बॅक पासबुकची मुळ प्रतीवरून पडताळणी केलेली प्रत दाखविली त्यास **नि.यु.२३** देण्यात येते.आता मला मी प्रकरणामध्ये दाखल मी गैरअर्जदार यांना माझे अधिवक्ता यांचेमार्फत रजिस्टर पोस्टाने पाठविलेल्या नोटीसची माझी कार्यालयीन प्रत दाखविली त्यास **नि.यु.२४** देण्यात येते. आता मला मी प्रकरणामध्ये दाखल माझा मयत मुलगा अक्षय डोंगरे याचा वाहन चालविण्याचा परवानाची मुळ प्रतीवरून प्रत दाखविली त्यास **नि.यु.२५** देण्यात येते.

**<u>उलटतपास श्री.खेळकर वकील गैरअर्जदारातर्फे:—</u>**

१४. माझे कुटुंबात एकुण तीन व्यक्ती आहेत. त्यामध्ये मी स्वत: माझे पती व माझी मुलगी आहे. माझे पती मजुरी करतात. माझे पती मदतनिसाचे गॅरेजमध्ये काम करतात. त्यांना आवश्यकतेनुसार लोकं बोलावुन घेवुन जातात. माझा मयत मुलगा अक्षय हा गैरअर्जदार यांचेकडे वाहनचालक म्हणुन सन,२०१८ पासुन कार्यरत होता याबाबत त्याच्या नियुक्तीचा आदेश मी प्रकरणात दाखल केलेला नाही. माझे मयत मुलगा अक्षय यास गैरअर्जदार यांनी गडचिरोली येथे जाण्यास सांगीतले होते याबाबत त्याने मला सांगीतले होते. तो कोणत्या तारखेला गडचिरोली येथे गेला होता हे मी सांगु शकत नाही परंतु तो अपघ ाताच्या चार ते पाच दिवसाआधी गडचिरोली येथे गेला होता. सदर चार पाच दिवसामध्ये मंगळवारी माझे बोलणे माझे मुला सोबत झाले होते त्यावेळेस त्याने मला सांगीतले होते की गाडी भरल्यावर मी येणार आहे. माझे मुलासोबत गाडीवर कोण—कोण होते हे मी सांगु शकत नाही. सदर गाडीवर गाडी मालक माझे मुलासोबत होते किंवा नाही याची मला माहिती नाही. माझे पुराव्यामध्ये नमुद सदर गाडीचा अपघात हा गाडी मालकाच्या चुकीने झाला याबाबत गाडी मालकाची काय चुकी होती हे मी सांगु शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर अपघात हा टॅंकर क्रं. एम.एच.४०—बि.जि.४०६० या वाहनाने सदर ट्रकला जोरदार धडक दिल्याने झाला. हे म्हणणे खरे आहे की, सदर अपघात हा टॅंकर क्रं. एम.एच.४०—बि.जि.४०६० ने धडक दिल्यामुळे झाला. हे म्हणणे खरे नाही की, मी वरील नमुद टॅंकर क्रं. एम.एच.४०—बि.जि.४०६० च्या मालकाविरूध्द व चालकाविरूध्द जिल्हा न्यायालयामध्ये प्रकरण दाखल केलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझा मयत मुलगा अक्षय हा गैरअर्जदार यांचेकडे चालक म्हणुन कधीही कामावर नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, तसेच माझा मयत मुलगा अक्षय याचेकडे ट्रक चालविण्याचा वाहन परवाना नव्हता. हे मला माहिती नाही की, माझे मयत मुलगा अक्षय याचेकडे जड वाहन चालविण्याचा परवाना नव्हता. माझे मुलाचा पगार रू.१६०००/— होता हे दर्शविणारा दस्त मी प्रकरणात दाखल

केलेला नाही.  हे म्हणणे खरे नाही की, माझे मयत मुलगा अक्षय यास दर महा रू.१६०००/—पगार नव्हता.  हे म्हणणे खरे नाही की, मला गैरअर्जदार यांचेविरूध्द प्रकरण दाखल करण्याचा अधिकार नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझे मुलाचा अपघात झाला नसता तर तो ७५ वर्ष व त्यापेक्षा जास्त जगला असता हे मी खोटे नमुद केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी गैरअर्जदार यांचेविरूध्द रू.१६६३८४०/— व त्यावर व्याजाचा खोटा दावा केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझा मयत मुलगा हा गैरअर्जदार यांचेकडे काम करीता नसल्यामुळे मी ते दर्शविणारे दस्त मी प्रकरणात दाखल केले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी गैरअर्जदार यांचेविरूध्द खोटे प्रकरण दाखल केलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज खोटी साक्ष देत असुन खोटे शपथपत्र दाखल केले आहे.

उलटतपास पुर्ण

फेरतपास काही नाही.

माझे समक्ष

स्वा/—

(श्रीमती रू.वि. मेटे)
न्यायाधीश

दि. ०३.०३.२०२५.

कामगार न्यायालय, चंद्रपुर.